# वनौषधी उद्यानाकरिता भूसंपादन

*राज्य शासनाकडे जमीन मागणीचा 'आसमंत'या संस्थेचा प्रस्ताव*

## संकल्पना चित्र

रत्नगिरीतील 'आसमंत' या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेचा कोकणातील पर्यावरण आणि जैवविविधता संवर्धन, या क्षेत्रात काम करून त्याद्वारे राज्यभरात लोकशिक्षण आणि लोकजागृती घडवून आणण्याचा मानस आहे. निसर्गप्रेम, जैवविविधता आणि आपल्या भोवतालच्या पर्यावरणाबाबतचे लोकांचे शिक्षण आणि जागृती हे समाजाच्या परिपूर्ण, बहुआयामी व शाश्वत विकासासाठी मूलभूत घटक आहेत. आजच्या वेगवान तंत्रज्ञान, आधुनिकीकरणाच्या युगात निसर्गाशी जवळीक साधणे मनुष्य विसरत चालला आहे. शहरांतच नाही तर आता शहरांलगतच्या गावांमध्ये देखील विस्तारत जाणाऱ्या बांधकामांमध्ये सुपीक जमिनी, डेरेदार उपयुक्त वृक्षझाडे लोप पावत चालली आहेत.

याचे महत्व जाणून 'आसमंत' संस्थेने रत्नागिरीतल्या काही निवडक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसोबत हा उपक्रम सुरू करण्याचे योजिले आहे. यांतर्गत रत्नागिरीतल्याच निवडक अशा महाविद्यालयांतल्या वनस्पतिशास्त्र, पर्यावरणशास्त्र, प्राणीशास्त्र, भूशास्त्र या विभागांतले आणि शेतकी महाविद्यालयातले किंवा या विषयांत विशेष रूची असणारे विद्यार्थी आणि विद्यार्थीनी यांच्याकडून पुढे नमूद केल्याप्रमाणे विविध कालावधीत वेगवेगळे प्रकल्प राबवण्याची योजना आहे.

या कामासाठी आसमंत या संस्थेमध्ये ३ व्यक्तींचा एक विशेष गट तयार केला जाईल. यामध्ये १ प्रकल्प समन्वयक, १ प्रकल्प अधिकारी, व १ प्रकल्प प्रबंधक

असेल. प्रकल्प समन्वयक हा निवडक महाविद्यालयांतील विभागीय शिक्षक, विद्यार्थ्यांबरोबर अभ्यास कामे, प्रकल्प रूपरेषा याविषयी चर्चा करून कामाचे स्वरूप ठरवेल. प्रकल्प अधिकारी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम करेल व वेळोवेळी तंत्रज्ञान, प्रशिक्षण यांची मदत करेल.

सदर प्रकल्प हा या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाचा भाग बनावा अशी अपेक्षा आहे. आसमंत संस्थेतर्फे तयार केलेली माहितीपत्रके आणि माहितीपुस्तिकांमध्ये स्थानिक पर्यावरण व जैवविविधता यांबद्दलची सखोल सचित्र माहिती असेल आणि हे साहित्य विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी दिले जाईल. यासाठी किरण पुरंदरे यांसारख्या व इतर अनेक तज्ज्ञांतर्फे वेळोवेळी योग्य ते मार्गदर्शन व प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येईल. विद्यार्थ्यांना पुस्तकी शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष कामाच्या अनुभवातून शिक्षण व पर्यावरण जाणीव निर्माण केली जाईल.

संस्थेची यामागची महत्वाची ४ उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

1. विद्यार्थ्यांना पर्यावरण व जैविक विविधता या विषयात पुस्तकी शिक्षणाबरोबर प्रत्यक्ष जमिनीवर काम करण्याची संधी उपलब्ध करून देणे.
2. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष काम आणि त्यातून होणारे शिक्षण याचा अनुभव देणे.
3. लोकांमध्ये जैवविविधता व पर्यावरण जाणिवांबद्दल जागृती निर्माण. जैविक विविधतेचे संवर्धन आणि निसर्ग पर्यटन (इको-टुरिझम) द्वारे निसर्गप्रेम वाढवणे.
4. निसर्ग आणि पर्यावरणासंबंधी अभ्यासपूर्ण प्रकल्प राबवणे.

**तक्ता १ – आसमंतच्या कार्याधिकाऱ्यांचे वेतन**

| | कार्याधिकारी | मासिक वेतन (रू.) | वार्षिक वेतन (रू.) |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्प अधिकारी | २५,००० | ३,००,००० |
| २ | प्रकल्प समन्वयक | २०,००० | २,४०,००० |
| ३ | प्रकल्प प्रबंधक | १५,००० | १,८०,००० |
| | **एकूण वेतनखर्च** | **६०,०००** | **७,२०,०००** |

आसमंत करू इच्छित असलेल्या काही महत्त्वाच्या प्रकल्पांचे संकल्पना चित्र खाली मांडत आहोत. या प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या निधीची मांडणी व मागणी वेगळी केली जाईल.

या प्रकल्पांव्यतिरिक्त सहभागी विद्यार्थ्यांबरोबर चर्चा करून त्यांची आवड बघून वेगवेगळे उपक्रम वेळोवेळी हाती घेतले जातील.

रत्नागिरी मध्ये १०० एकर परिसरात जैवविविधतेचं संरक्षण हा हेतू डोळ्यापुढे ठेवून, वनस्पती उद्याने आणि नैसर्गिक झऱ्यांचे पुनरूज्जीवन आणि संवर्धन करण्यासाठीचा हा प्रकल्प आहे.

झपाट्याने वाढणाऱ्या औद्योगिकीकरण व शहरीकरणामुळे रत्नागिरी, पश्चिम घाट व आसपासच्या भागांत जमीन व त्यावरील वृक्षसंपदा या नैसर्गिक संसाधनांवरचे आक्रमण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. यामुळे वर्षानुवर्षे नैसर्गिक सौंदर्यात भर घालणाऱ्या व खरी संपत्ती असलेल्या तिथल्या स्थानिक व दुर्मिळ जातींच्या वनस्पतींचे (फळझाडे, औषधी झाडे, पक्ष्यांच्या अस्तित्वासाठीचे आवश्यक वृक्ष) अस्तित्वच आज धोक्यात आले आहे.

या वनस्पतींचे, वृक्षांचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या उद्देशाने आसमंत कोकणामध्ये – रत्नागिरीच्या आसपास १०० एकराच्या क्षेत्रात एक ’वनस्पती उद्यान’ (Tree Park)

विकसित करू इच्छिते, ज्यामध्ये या स्थानिक दुर्मिळ जाती, प्रजातींच्या झाडांचे रोपण करून त्यांची निगा राखली जाईल. महाराष्ट्र सरकारने आसमंत या संस्थेला सदर १०० एकर भूक्षेत्र संपादित करून द्यावे अशी मागणी आहे.

प्रकल्पाची मुख्य उद्दिष्ट्ये-

1. नष्ट होत चाललेल्या विविध प्रजातींच्या वनस्पतींची बी-बियाणे गोळा करणे. हे बी-बियाणे वनक्षेत्रांतून, योग्य व दर्जेदार स्त्रोतांकडून स्थानिक लोकांच्या, वनविभागाच्या व निवडक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहकार्याने गोळा केले जाईल.
2. भोवतालच्या परिसरात असलेले नैसर्गिक झऱ्यांचे स्त्रोत शोधणे व उद्यान क्षेत्रामध्ये पाणी देण्याची व्यवस्था करणे. उदा. ठिबक व तुषार सिंचन.
3. या १०० एकर जमिनीत असलेले नैसर्गिक झरे आणि पाणवठ्यांचे पुनरुज्जीवन करणे व गरजेनुसार नव्याने निसर्गस्नेही पाणवठ्यांची निर्मिती करणे.
4. रोपं वाढवण्यासाठी उद्यानक्षेत्रामध्येच (संवर्धन स्थान) रोपवाटिका तयार करणे
5. वृक्ष उद्यानासाठीच्या संपादित क्षेत्रावर अतिक्रमण टाळण्यासाठी संपूर्ण उद्यानाच्या भोवती सुरक्षारक्षक लोखंडी तारांचे कुंपण घालून घेणे.
6. वनस्पती उद्यान हे प्रादेशिक दुर्मिळ वनस्पतींच्या अभ्यासासाठी आणि संवर्धनासाठी एक शैक्षणिक स्थान या दृष्टीने विकसित करणे.
7. वनस्पती उद्यानाची निगा राखणे व देखभाल करणे.
8. दुर्मिळ वनस्पतींच्या सुदृढ बियांची पेढी (seed bank) निर्माण करणे.
9. या वनस्पती उद्यान प्रकल्पाद्वारे समाजामध्ये दुर्मिळ वनस्पतींचे संरक्षण व संवर्धन याबाबत जागृकता निर्माण करणे.
10. उद्यानक्षेत्रात निसर्ग पर्यटनाचे कार्यक्रम आयोजित करणे.

11.विद्यार्थ्यांसाठी वनस्पती उद्यानातील वनस्पती, झाडे, पक्षी यांबद्दल माहिती देणारी अभ्यास पुस्तिका आणि शैक्षणिक साहित्य बनविणे.

## वनौषधी उद्याना करिता राज्य सरकारकडे जमिनीची मागणी

***वनौषधी उद्यान उभारण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने 'आसमंत' या संस्थेला १०० एकर जमीन भाडेकरारतत्वावर (on lease) द्यावी.***

## वनस्पती उद्यान

सुंदरी, भारंग (भेंडक), बुद्धाज कोकोनट, कुकर, करू, रूद्राक्ष, सोनसावर, अर्जुन, काळा कुडा, सातरीठा, ऐन, उंबर, पिंपळ, वड, पळस, धावडा, रिठा, चिंच, कळम, सीता अशोक, पिसा, कुसुम, मोह, रक्तचंदन, टेटू, खैर, खरळ अशा इथल्या मातीतल्या विशिष्ट वृक्षांची जोपासना करून वृक्ष उद्यान तयार करण्यात येईल.




**Giant Squirrel**

## पक्षी-झाड विशिष्ट समीकरण अभ्यास

आज सगळीकडेच झाडांची मोठ्या प्रमाणात तोड होत असल्याने पक्ष्यांची निवासस्थाने नष्ट होत आहेत. रत्नागिरीतदेखील दिवसेंदिवस वाढत्या शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर झाडे तोडली जाऊन पक्ष्यांची आबाळ होत आहे. यावर उपाय म्हणून पक्ष्यांच्या स्थानिक जातींना अन्न व निवाऱ्यासाठी आवश्यक असलेल्या झाडांच्या प्रजातींचे संशोधन केले जाईल.



**Yellow-footed Green Pigeon**

तज्ज्ञांच्या अभ्यासाअंती असे निदर्शनास आले आहे की, पक्षी-झाड हे एक वैशिष्ट्यपूर्ण समीकरण ठरलेले असते. विशिष्ट पक्षी काही विशिष्ट झाडांवर आपल्या अन्न, फुलांमधून मिळणारा रस, कीटक, बसण्याचे ठिकाण, घरटे बनविण्याचे ठिकाण यांसाठी अवलंबून असतात. या सर्व गोष्टी पक्षी-झाड या वैशिष्ट्यपूर्ण नात्यात येतात. झाड्यांच्या बियांचे लांब लांब अंतरांवर वितरण होणे हे त्या झाडाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असते. पक्षी या झाडांच्या बिया लांब अंतरांवर नेण्याचे महत्वाचे काम करतात. अशा प्रकारे पक्षी-झाडे यांचे परस्परपूरक

कार्यपद्धतीचे महत्व ओळखून ते वाढेल याची दक्षता घेतली जाईल. वरील अभ्यासावर आधारित अशा विशिष्ट झाडांचे उद्यान तयार करण्यात येईल. यामुळे पक्षांचे व झाडांचे देखील संवर्धन होईल.



**Red Vented Bulbul**

# वनौषधी उद्यान

## वनौषधी संवर्धन प्रकल्प

उपलब्ध औषधी वनस्पतींचे संवर्धन व अभ्यास, दुर्मिळ औषधी वनस्पतींचे संशोधन, संरक्षण आणि संवर्धन हा यामागचा प्रमुख उद्देश आहे. पश्चिम घाटातल्या दुर्मिळ व नष्ट होणाऱ्या औषधी वनस्पतींचे सर्वेक्षण करणे, सूची करणे व सर्व समावेशक नोंदी करणे हे काम विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने केले जाईल.

वनौषधींचे जतन व्हावे तसेच दुर्मिळ होणाऱ्या वनौषधींची लागवड होऊन संवर्धन करता यावे, यासाठी वनौषधी प्रकल्प राबविला पाहिजे. जंगले झपाट्याने कमी होत आहेत आणि याबरोबर औषधी वनस्पतींचा वेगाने ऱ्हास होत चालला आहे. बऱ्याच औषधी वनस्पती आजच्या घडीला दुर्मिळ झाल्या आहेत आणि पूर्वीसारख्या उपलब्ध

होत नाहीत. या दुर्मिळ झालेल्या वनौषधींचे अस्तित्व पूर्णपणे संपुष्टात येण्याआधीच त्यांचे संरक्षण व संवर्धन करणे अत्यंत गरजेचे आहे.



**Glory Lilly**

या प्रकल्पांतर्गत औषधी वनस्पतींच्या सुधारित पद्धतीने लागवडीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, बियाणे व जैविकतेचा खात्रीशीर स्रोत निर्माण करण्यासाठी जनुकीय पेढी (genetic bank), बियाणे साठा निर्माण करणे हेही साधले जाईल.

औषधी वनस्पती आणि लोकप्रचलित वनौषधींचे उपयोग, त्यांची समग्र माहिती, त्यांचे मानवी जीवनातील महत्त्व, त्यांचा प्रचार तसेच संवर्धन करण्याकरिता 'वनौषधी उद्यान' तयार करणे एक प्रभावी साधन आहे.

हे 'वनौषधी उद्यान' पश्चिम घाट व रत्नागिरीतल्या स्थानिक औषधी वनस्पतींचे जीवित संग्रहालय असेल. या उद्यानामध्ये येणाऱ्या निसर्गप्रेमी, पर्यटक, अभ्यासक, विद्यार्थ्यांना या औषधी वनस्पतींची शास्त्रीय सखोल माहिती मिळेल आणि मोठ्या प्रमाणावर जागृती निर्माण होईल.



**Beheda**

या उद्यानामुळे विद्यार्थ्यांमध्ये तसेच लोकांमध्ये औषधी वनस्पतींच्या पारंपारिक उपयोगाबाबत आवड निर्माण होईल.

एक एकर जागेत ५० ते ७५ जातींच्या वनस्पती या उद्यानात लावण्यात येतील. यात दुर्मिळ औषधी वनस्पतींचादेखिल समावेश असेल उदाहरणार्थ- सीता अशोक, लोधरा, नरक्या.

## नैसर्गिक झऱ्यांचे संवर्धन

नैसर्गिक झऱ्यांचे जतन, बुजलेल्या झऱ्यांचे पुनरुज्जीवन करणे अत्यंत गरजेचे असते. फुलपाखरांपासून बिबट्या-वाघांपर्यंत सगळेच वन्य जीव नैसर्गिक झऱ्यांवर अवलंबून असतात. म्हणून जिवंत झरे वाचविणे, त्यांचे संवर्धन करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.



**नैसर्गिक झऱ्यावर बिबटा**

अनेक नैसर्गिक व मानवनिर्मित कारणांमुळे नैसर्गिक झरे बुजलेले आहेत. सुरुंग लावणे, राडारोडा टाकणे, रस्ते आणि कालवे काढणे, दरडी कोसळणे, पुराच्या पाण्यामधून गाळ वाहून येणे, पाला-पाचोळा, काड्याकुड्या साचून राहणे अशा अनेक कारणांमुळे झरे बंद झालेले आहेत. बंद झालेले नैसर्गिक पाणवठे व झरे स्वच्छ करून त्यांचे पुनरुज्जीवन करण्यात येईल. अशा नैसगिक झऱ्यांचे संरक्षण व संवर्धन केले जाईल.



**नैसर्गिक झऱ्यावर पाणि पिताना पक्षी**

या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबरच स्थानिक लोकांनादेखील मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेण्यात येईल. स्थानिक लोकांचे अनुभवसिध्द पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान यांची सांगड घालून हा उपक्रम राबविण्यात येईल. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना झऱ्यांचा व नैसर्गिक पाणवठ्यांचा शास्त्रीय अभ्यास, त्यांचे पुनरुज्जीवन असे प्रशिक्षण दिले जाईल.